**भुसंपादन प्रकरण क्रमांक 07/मौ.वकाणा/2020-21**

**प्रारंभीक अधिसुचना**

क्र.कावि/अका/भुसंपादन/मौ.वकाणा/ /2021
उपविभागीय अधिकारी,जळगांव जा.यांचे कार्यालय,
दिनांक:- / 15/03 /2021

भुमीसंपादन,पुनर्वसन व पुर्नस्थापन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 11 (एक) अन्वये खालील अधिसुचना.

ज्याअर्थी भुमीसंपादन,पुनर्वसन व पुर्नस्थापन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 ( 30 चा 2013) च्या कलम 3 च्या खंड (इ)च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकिय अधिसुचना, महसुल व वनविभाग क्र.एम.आय.एस.11/2014/सी.आर.71/अे-2 दिनांक 11.09.2015 ( यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील 10,000/- हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याचा संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येइल..

आणि ज्याअर्थी उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते,ज्याच्या स्वरुपाचे विविरण यासोबत जोडलेल्या अनुसुचि दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (1) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की,उक्त जमिनिची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसुचि तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी कम 43 च्या पोट कलम (1) अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना यां प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसुची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम 4 अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खाली कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

//2//

परंतु उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सुट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (5) अनुसार, जिल्हाधिकारी भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क ( महाराष्ट ) नियम, 2014 ( यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम 10 च्या उपनियम (3) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अदययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी जळगांव जा. यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसुची-1**

**जमिनीचे वर्णन**

गांव : वकाणा ता : संग्रामपुर जिल्हा : बुलडाणा.

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | क्षेत्र ( हेक्टरमध्ये ) |
|---|---|---|
| 1 | 177 | 0.15 |
| 2 | 178 | 0.52 |
| 3 | 179 | 0.36 |
| 4 | 180 | 0.81 |
| 5 | 182 | 0.81 |
| 6 | 262 | 0.18 |
| 7 | 262 | 0.68 |
| 8 | 262 | 0.60 |
| 9 | 265 | 0.24 |
| 10 | 265 | 0.40 |
| 11 | 266 | 0.35 |
| 12 | 268 | 0.71 |
| 13 | 269 | 1.08 |
| 14 | 270 | 0.15 |
| 15 | 271 | 0.36 |
| 16 | 274 | 0.40 |
| 17 | 274 | 0.40 |

| | | |
|---|---|---|
| 18 | 276 | 0.02 |
| 19 | 276 | 0.02 |
| 20 | 276 | 0.02 |
| 21 | 276 | 0.02 |
| 22 | 276 | 0.01 |
| 23 | 276 | 0.01 |
| 24 | 277 | 0.02 |
| 25 | 278 | 0.02 |
| 26 | 290 | 0.11 |
| | एकुण | 8.45 |

**अनुसुचि - 2**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव : - मौ.चोंढी बृहत लघु पाटबंधारे योजना ता.संग्रामपुर जि.बुलडाणा.

प्रकल्प कार्याचे वर्णन - मौजे चोंढी बृहत लघु पाटबंधारे योजनेचे बुडीत क्षेत्र व धरणाच्या भिंतीसाठी मौ.वकाणा ता.संग्रामपुर जि.बुलडाणा येथिल खाजगी जमीनीचा भुसंपादन प्रस्ताव.

समाजाला मिळणारे लाभ: - या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणी पुरवठा, उदयोगधंदयांना पाणीपुरवठा होणार आहे.त्याच बरोबर ग्रामिण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING ) सुधारणा होणार आहे.

**अनुसुचि - 3**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- सदरचा प्रकल्प हा सिंचनाचा अनुशेष दुर करण्यासाठी आवश्यक असून दुष्काळ प्रवण भागातील कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमीनीवर असून त्यास शेतक-यांची संमती आहे. यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्याने तसेच त्यामधिल व्यक्ती विस्थापित होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसुचि - 4**

**सामाजिक परीणाम निर्धारणाचा सारांश**

अतिरिक्त संचालक भारत सरकार व पर्यावरण् मंत्रालय, पर्यावरण भवन, लोधी रोड, नवी दिल्ली-110003 क्रमांक जे/12011/22/2007/आयएआय दिनांक 11.02.2007 अन्वये पर्यावरण सर्व्हेक्षण मंजूरी झालेली असल्याने भुसंपादन अधिनियम 2013 चे प्रकरण क्र.02 कलम 06 (2 ) चे परंतुकानुसार-provided that

//4//

in respect of irrigation project where the process of Environment Impact Assessment is required under the provision of any other law for the time being in force, the provision of the Act relating to Social Impact Assessment shall not apply असे नमुद केले असल्याने सामाजिक परिणाम निर्धारण लागु नाही.

**अनुसुचि- 5**

रोजगारांच्या संधी उपबल्ध होणार असल्यामुळे भूसंपादनास शेतक-यांची संमती आहे. तसेच सदरचा प्रकल्प हा अनुषेशग्रस्त जिल्हयातील दुष्काळ प्रवण भागातील असून अतिशय कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमीनीवर असून यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गांवठाण बाधीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. सबब प्रशासक नियुक्तीचा प्रश्न उदभवत नाही.

ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

क. ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनाचा तपशिल. :- निरंक

टिप:- उक्त जमिनीच्या आराखडयाचे उप विभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, जळगांव जामोद ज़ि. बुलडाणा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- 16/03/2021

ठिकाण :- बुलडाणा.

(कु.वैशाली देवकर )
उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी,जळगांव जा.

( एस.राममुर्ती भा.प्र.से. )
जिल्हाधिकारी, बुलडाणा.